ISSN 2231-2137

# CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal

UGC Approved Journal No. 62441, NAAS Score 2018 : 3.23

Impact Factor 2016 : 0.956 (GIF)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

B.S.P.M. Wadala

ॐ श्री

सोलापूर विद्यापीठ



श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

माऊली महाविद्यालय, वडाळा ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र) व विद्यापीठ अनुदान आयोग आयोजित

—— एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र ——

## ॥ संत साहित्याचे योगदान ॥

विशेष अंक

संत तुकाराम बिज, शनिवार ३ मार्च २०१८











ISSN 2231-2137

# CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

**A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal**

**UGC Approved Journal No. 62441, NAAS Score 2018 : 3.23, Impact Factor 2016 : 0.956 (GIF)**

129/498, Vasant Vihar, Near Old Pune Naka, Solapur-413001 (Maharashtra, India)

e-mail: researchspectrum@gmail.com, wizcraftpublication@gmail.com, deepak_nanaware2003@yahoo.com

Cell: 09637335551, 07020828552



ॐ श्री

**श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित**

**माऊली महाविद्यालय, वडाळा ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र) व विद्यापीठ अनुदान आयोग आयोजित**

**—— एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र ——**

# ।। संत साहित्याचे योगदान ।।

## विशेष अंक

**संत तुकाराम बिज, शनिवार ३ मार्च २०१८**

---

## संयोजक

# माऊली महाविद्यालय, वडाळा ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

## CONTENTS


| Sr. No. | Title of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1 | भक्ती परंपरेतील स्त्री साहित्याचे योगदान<br>प्रा. डॉ. असिया चिश्ती | 01 |
| 2 | संत साहित्य : सर्वांगी स्पर्श करणारे तत्त्वज्ञान<br>डॉ. प्रदीप औजेकर | 04 |
| 3 | 'संत एकनाथांचे साहित्यातील योगदान: एक दृष्टीक्षेप'<br>प्रा. सौ. सुवर्णा वैभव यमगर | 06 |
| 4 | महाराष्ट्रातील सूफी आणि दत्त संप्रदायाचे वाङ्मयीन योगदान<br>प्रा. टकले गणेश प्रल्हादराव | 09 |
| 5 | ''संत साहित्यातील विश्वात्मकता' व सर्वधर्मसमभाव...!''<br>प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी | 11 |
| 6 | "संत साहित्यातील सामाजिक मूल्ये"<br>प्रा. पसरकल्ले एस. पी. | 14 |
| 7 | संत जनाबाई यांच्या अभंगातील सामाजिक दृष्टिकोन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये<br>प्रा. परमेश्वर हटकर | 16 |
| 8 | महाराष्ट्रातील भक्ती चळवळीचे योगदान<br>डॉ. रमेश शिंदे | 19 |
| 9 | संत साहित्य आणि समाज प्रबोधन<br>डॉ. जनार्धन परकाळे | 22 |
| 10 | भक्तीपरंपरेतील स्त्रीसाहित्याचे योगदान<br>श्री. डॉ. अनिल बांगर, | 24 |
| 11 | संत साहित्य आणि समाजप्रबोधन<br>प्रा. डॉ. नवनाथ दणाणे | 27 |
| 12 | ''संत साहित्यातील संत कवयित्रींच्या रचना–एक अभ्यास''<br>प्रा. व्यवहारे एस. टी. | 30 |
| 13 | संत कवयित्री - निर्मळाबाई<br>प्रा. सोनवले राजकुमार रंगनाथ | 33 |
| 14 | संत एकनाथांचे सामाजिक कार्य<br>श्री. सुहास बापू मोरे | 35 |
| 15 | संत साहित्याच्या निर्मिती प्रेरणा<br>प्रा. सौ. स्वाती माने-थिटे | 37 |
| 16 | संतसाहित्यातील भाषिक व मुल्यविचार : संशोधन संधी<br>प्रा. नानासाहेब महादेव गव्हाणे | 40 |
| 17 | वारकरी संप्रदायातील स्त्रियांचे योगदान<br>भागवत लहुबुवा ढोले | 42 |
| 18 | संत साहित्याची सार्वकालिकता<br>डॉ. दत्तात्रय महादेव डांगे व डॉ. विद्या विजय नावडकर | 44 |
| 19 | मराठी भाषेचे नवनीत – समग्र तुकाराम<br>श्री. अनिलकुमार राजाराम पाटील | 47 |
| 20 | सुधारणावादी पुरोगामी संत : गाडगेबाबा<br>प्रा. डॉ. लहू वाघमारे | 48 |
| 21 | संत साहित्यातील जातीयता...<br>प्रा. गौतम गायकवाड | 52 |
| 22 | सांस्कृतिक पर्यावरण आणि मध्ययुगीन स्त्रीवादाचे चित्रण<br>प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे | 56 |
| 23 | "नाथांचा धर्म आणि साहित्यातून समाज प्रबोधन"<br>प्रा. डॉ. अनिता प. खंडागळे | 61 |

Contemporary Research in India (ISSN 2231-2137): UGC Approved Journal No. 62441 - NAAS Score 2018: 3.23

# संत साहित्य आणि समाजप्रबोधन

**प्रा. डॉ. नवनाथ दणाणे,** सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA
ISSN 2231 - 2137

Received: 12/12/2017 | Edited: 17/12/2017 | Accepted & Published: 03/03/2018

संत साहित्य आणि समाजप्रबोधन हे एक अतूट नाते आहे. समाजप्रबोधन हे मानवी मूल्यांना केंद्रस्थानी मानणारे प्रयोजन आहे. संत साहित्याने मानवी समता, न्याय व बंधूता प्रस्थापित करण्यासाठी, समाजप्रबोधनाचे अलौकिक कार्य केले आहे. मराठी संत साहित्य हे मूळातच समाजप्रबोधनांच्या अंतः प्रेरणेतून निर्माण झाले आहे. संत साहित्यातील समाजप्रबोधनामागे व्यवस्थापरिवर्तन हे अंतिम ध्येय आहे. संत साहित्य समाजप्रबोधनाच्या परिप्रेक्षातच विस्तारताना दिसते. थोडक्यात, संत साहित्या आणि समाजप्रबोधनाला खूप मोठी परंपरा लाभली आहे.

मराठी संत साहित्याची चळवळ बाराव्या शतकापासून सुरु होताना दिसते. बाराव्या शतकातील महानुभाव संप्रदायाने काही प्रमाणात समाजप्रबोधनाचा विचार मांडला आहे. महानुभाव संप्रदायाचे प्रणेते चक्रधर स्वामी यांनी आपल्या संपद्रायामध्ये समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंपरागत चातुर्वर्ण्य व्यवस्थेला त्यांनी विरोध दर्शविला आहे. "उत्तम म्हणजे ब्राम्हणः आन अधम म्हणजे मातंग ऐसी म्हणेः परि तोही मनुष्य देही आन निष्पत्तिकारकची असेः परि वृथा कल्पना करी "[१] अशा शब्दात जातीवरुन ठरविले जाणारे माणसाचे श्रेष्ठ कनिष्ठत्व चक्रधरांनी स्पष्टपणे नाकारले आहे. चातुर्वर्ण्य ही केवळ निरर्थक कल्पना असल्याचे ते सांगतात. त्यांनी आपल्या आचार कृतीतूनही अनेक वेळा जातिभेदाला मूठमाती देणारा आदर्श घालून दिला आहे. ते मांगा, महारा घरी आरोगणाही करीत असत. चक्रधरांनी आपल्या महानुभाव संप्रदायाच्या माध्यमातून, स्त्री-पुरुष समता प्रस्थापित करण्याचाही प्रयत्न केला आहे. चक्रधर स्त्री शिष्यांना संन्यास घेण्याची अनुमती देतात. त्यासाठी ते जनमानसात जागृती करतात. समाजप्रबोधनाचे त्यांचे हे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

तेराव्या शतकातील ज्ञानेश्वरांनीही काही प्रमाणात समाजप्रबोधनाचा विचार मांडला आहे. त्यातून ते काही अंशी समतेचा आग्रह धरताना दिसतात. "म्हणोनि कूळ जाती वर्ण | हे आवघेचि अकारण ||"[२] अशा सौम्य स्वरुपात का असेना, ज्ञानेश्वर वर्णव्यवस्था नाकारतात. ज्ञानेश्वर वर्णव्यवस्थेची व्यर्थता सांगातात, परंतु तिच्या विरोधात बंडात्मक पवित्रा घेताना दिसत नाही. गं.बा. सरदार म्हणतात त्याचप्रमाणे "ज्ञानेश्वरांनी वैदिक परंपरेला श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माला प्रमाण मानले होते. श्रुतीला तर ते साक्षात 'माऊली' म्हणतात."[३] विषमताधारक समग्र समाजव्यवस्था बदलण्यासाठी ते बंडखोर भूमिका घेताना दिसत नाहीत. त्यामुळे ज्ञानेश्वरांचे समाजप्रबोधन हे मर्यादित स्वरुपाचे ठरते.

संत नामदेवांच्या कवितेमध्येही समाजप्रबोधनाचा विचार आलेला दिसतो. नामदेव सरळ सरळ व्यवस्था नाकारत नसले तरी, "सोवळे ओवळे उंच नीच वर्ण | नाही येथे गुणदोष काही ||"[४] किंवा "नाही याती कुळ, उंच नीच भेद | भाव एक शुध्द पाहतसे ||"[५] अशा शब्दात आध्यात्मिक (भक्ती) क्षेत्रात समतेचा आग्रह धरतात. वेदाविषयीही ते आपला अभिप्राय देतात. "तत्व पुसायासी गेलो वेदज्ञासी | तव तयापासी भरिले विधिनिषेध"[६] अशा शब्दात वेदनीतीविषयी आपली नाराजी प्रकट करतात. नामदेवांचा हा प्रबोधनाचा हेतू हा अंतिमतः भक्तिच्या अंगानेच जाणारा आहे. त्यामुळे तत्कालीन समाजव्यवस्थेवर ते फारसा प्रभाव टाकू शकले नाहीत. नामदेवांच्या संत मेळयातील दुसरे संत 'चोखामेळा' यांच्या कवितेमध्येही सामाजिक बंड पाहायला मिळत नाही. समाजव्यवस्थेने 'अतिशूद्र' ठरविलेल्या महार जातीत जन्मलेल्या, चोखामेळा या संतानेही केवळ अध्यात्मिक क्रांतीचाच आग्रह धरला आहे. आपल्या पमरेश्वर प्राप्तीच्या भक्ती मार्गात अडथळा ठरलेल्या वेद, शास्त्र व पुराणांला अपवित्र ठरविण्यामागेही त्यांचा हाच दृष्टीकोन दिसतो. "वेदासी विटाळ, शास्त्रासी विटाळ| पुराने अंमगळ विटाळाची ||"[७] किंवा "कोण तो सोवळा | कोण तो ओवळा | दोन्ही वेगळा विठू माझा ||"[८] या रचनांमधून चोखोबा वेद, शास्त्र व पुराण समर्थकांना, तसेच विठ्ठल दर्शनाआड येणाऱ्या चातुर्वर्ण्य समर्थकांना प्रश्न विचारतात. परंतु त्या प्रश्नामागे त्यांचा भक्तीभावच दडलेला आहे. चोखोबांचे हे समाजप्रबोधन व त्यामागील बंड हे केवळ प्रश्न विचारण्यापुरतेच सीमित होताना दिसते.

चोखामेळाच्या तुलनेत 'कर्ममेळा' यांच्या काव्य रचनेतील सामाजिक जाणीव अधिक तीव्र दिसते. कर्ममेळा यांनी आपल्या हीनत्वाचा जाब थेट परमेश्वरालाच विचारला आहे. "आमुची केली हीन याती | तुज न कळे श्रीपती || जन्म गेला उष्टे खाता, लाज न ये तुमच्या चित्ता | |"[९] कर्ममेळा परमेश्वराला प्रश्न विचारण्याची निर्भयता दाखवताना दिसतो. आपल्या हीनत्व व दारिद्र्याबद्दल जाब विचारताना, सन्मानपूर्वक परमेश्वराची लाज काढण्याचे धाडस करतो. तरीही वर्णव्यवस्था ही परमेश्वर निर्मित्त नसून, ती मानव निर्मित्त, कृत्रिम आहे. या निष्कर्षाप्रत येताना दिसत नाही. तसा पवित्रा घेताना तो दिसत नाही. त्यामुळे कर्ममेळाच्या समाजप्रबोधनाचाही प्रभाव फारसा जनमाणसावर पडला नाही.

सोळाव्या शतकातील संत एकनाथही सामाजिक समतेऐवजी अध्यात्मिक समतेसाठीच समाजप्रबोधन करताना दिसतात. संत एकनाथ

लोक समाजाची लूट व दिशाभूल करीत आहेत. या विषयी तुकाराम भोळ्या भाबडया समाजाला जागृत करतात.

जन्माधारित जातिव्यवस्था तुकाराम अमान्य करतात. मनुष्य एखाद्या विशिष्ट जातीमध्ये जन्माला आला, म्हणून श्रेष्ठ ठरत नाही. तर तो त्याच्या कर्माने, आचरणाने श्रेष्ठ ठरत असतो. अशी स्पष्ट भूमिका घेतात. "वर्णअभिमाने कोण जाले पावन | ऐसे द्या सांगून मजपाशी" || (अभंग क्र.४२११) किंवा "विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म | भेदाभेद भ्रम अभंगळ ||" (अभंग क्र.४६) अशा शब्दात वर्णाभिमान व जातिभेद नाकारतात.

एकेश्वरवादाचा आग्रह हा एक तुकारामांच्या समाजप्रबोधना मागील महत्त्वाचा धागा आहे. हिंदू धर्म व्यवस्थेमधील ३३ कोटी देव ही धारणा त्यांनी नाकारली आहे. विठ्ठलाशिवाय इतर कोणत्याही देवदैवताचे अस्तित्व ते मान्य करताना दिसत नाहीत. ईश्वर प्राप्तीसाठी अंधश्रध्दाची कर्मकांडांना त्यांचा विरोध आहे. त्यासंदर्भात ते मोठया प्रमाणात प्रबोधन करतात. त्याचबरोबर ढोंगी, दांभिक भोंदू गिरीवरही ते प्रहार करतात. बाह्यात्कारी गोष्टींचे अवडंबर करुन समाजाची दिशाभूल करण्याच्या प्रवृत्तीला ते चांगलेच धारेवर धरतात. एकंदर तुकाराम अध्यात्मिक समतेबरोबरच सामाजिक समतेचाही आग्रह धरतात. थोडक्यात, अध्यात्मिक व सामाजिक समता व समाजोध्दाराच्या दृष्टीकोनातून, संत साहित्याचे व समाज प्रबोधनाचे नाते दृढ होताना दिसते.

संदर्भ व टिपा


१) शंकरराव खरात :- 'संतांची सामाजिक दृष्टी', कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे-३० प्रथमावृत्ती २००५, पृ. ८६

२) गंबा. सरदार :- 'संत वाडमयाची सामाजिक फुलश्रुती', श्रीविद्या प्रकाशन पुणे -३० चतुर्थावृत्ती पृ,. ४६

३) तत्रैव :- पृ. १२

४) हरी श्रीधर शेणोलीकर (संपा.) :- 'नामदेव गाथा' प्रकाशन - साहित्य अकादेमी, नवी दिल्ली प्रथमावृत्ती : २००३ (प्रस्तावना) पृ.२८

५) तत्रैव :- पृ. २८

६) सतीश बडवे :- 'मध्ययुगीन साहित्यातील विद्रोह' (लेख) 'साहित्य आणि विद्रोह' संपा. पृथ्वीराज तौर उनि. पृ. ४६

७) शंकरराव खरात :- 'चोखोबांचा विद्रोह', सुगावा प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती : १४ एप्रिल, २००२, पृ. २६

८) तत्रैव :- पृ. २६

९) तत्रैव :- पृ.२६

१०) तत्रैव :- 'संताची सामाजिक दृष्टी', उनि, पृ.१३४

११) पुरुषोत्तम लाड (संपा.) :-'श्री तुकाराम बाबांच्या अभंगाची गाथा' प्रकाशन- शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई द्वितीयावृत्ती : १९५५ पृ.५६३ अभंग क्र.३३९६

१२) टीप :- पुढील इतर सर्व अभंग क्रमांक हे पुरुषोत्तम लाड संपादित, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई प्रकाशित, 'श्री तुकाराम बाबांच्या अभंगांची गाथा' या गाथेतील आहेत.



College Building



Girls' Hostel


# CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal

UGC Approved Journal No. 62441, NAAS Score 2018 : 3.23

Impact Factor 2016 : 0.956 (GIF)

www.contemporaryresearchindia.net

विशेष अंक - संत साहित्याचे योगदान

ISSN 2231-2137